


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६७२. वा | गुरुवार | दि. ०१ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# भुजबळांचे लाड कशाला, मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा, शिंदे गटाच्या दोन आमदारांची मागणी...

वृत्तसंस्था/मुंबई

मनोज जरांगे पाटील यांची सगेसोयरेबाबतची मागणी मान्य केली आहे. त्यामुळे मराठ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पण सरकारच्या या निर्णयावर मंत्री छगन भुजबळ यांनी आक्षेप घेतला आहे. त्यांनी हा कायदा कोर्टात टिकणार नाही यासाठी कायदेशीर बाजूंचा अभ्यास करायलाही सुरुवात केली आहे. मुख्यमंत्र्यांनी मनोज जरांगे यांना सगेसोयरेबाबतचा अध्यादेश दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी छगन भुजबळ यांनी ओबीसी नेत्यांची बैठक बोलावली. छगन भुजबळ यांच्या या भूमिकेमुळे सरकारवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. एकीकडे सरकार मनोज जरांगे यांची मागणी पूर्ण करताना दिसत आहे. तर दुसरीकडे छगन भुजबळ मनोज जरांगे यांच्यावर सडकून टीका करत आहेत. छगन भुजबळ यांच्या भूमिकेमुळे आता सरकारमध्ये सारं काही आलबेल नाही, असंच चित्र दिसत आहे. कारण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाच्या जोन आमदारांनी छगन भुजबळ यांची मंत्रिमंडळातून थेट हकालपट्टी करा, अशी मागणी केली आहे. शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी छगन भुजबळांची थेट मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा, अशी मागणी केली आहे. विशेष म्हणजे त्यांच्या मागणीवर संजय शिरसाट यांनी प्रतिक्रिया देताना त्यांनीदेखील भुजबळांवर टीका केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब भूजबळ यांची हकालपट्टी करा. कशाला लाड करता? याला आधी बाहेर काढा, असं आवाहन संजय गायकवाड यांनी केलं आहे. तर संजय शिरसाट यांनीदेखील भुजबळांना राजीनामा देण्याचा सल्ला दिला आहे. मंत्री छगन भूजबळ जो तिरस्कार करतात ते योग्य नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब भूजबळ यांची हकालपट्टी करा. कशाला लाड करता? याला आधी बाहेर काढा. मंत्रीपदाची शपथ घेताना सरकारच्या विरोधात काम करणार नाही याची शपथ भूजबळ यांनी घेतली आहे. भूजबळ यांच्या भूमिकेशी सरकार सहमत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतेही सहमत नाहीत. मुख्यमंत्र्यांनी छत्रपतींची शपथ घेतलीय. ज्या मराठ्यांनी हा देश वाचवला त्यांच्या विरोधात भूमिका घेणे योग्य नाही. एका मंत्र्याच्या विरोधाने सरकारला फरक पडत नाही, मी खुलेआम सांगतोय. त्यांच्या राजीनाम्याने ना सरकारला फरक पडणार आणि ना एनसीपीलाफक, अशी टीका संजय गायकवाड यांनी केली आहे. जो जीआर निघाला तो जरांगे पाटील यांच्या सांगण्यानुसार निघालाय. सगळ्या प्रक्रिया पूर्ण होतील. ५७ लाख नोंदी सापडल्या आहेत. वेगळ्या आरक्षणाची त्यांना गरज नाही. ते ओबीसीच आहेत. त्यांना सर्टिफिकेट मिळायला हवं. सगेसोयरेबाबत अधिसुचना १६ फेब्रुवारीला निघेल. तोपर्यंत जरांगे पाटील यांनी दम धरावा आंदोलन करू नये , सरकार सकारात्मक आहेफक, अस देखील आवाहन संजय गायकवाड यांनी केलं. संजय गायकवाड यांचं वक्तव्य वैयक्तिक असलं तरी, काही लोकांना राजकारण करायचं असेल तर त्यांनी सरकारमधून बाहेर पडलं पाहिजे. सरकारमधील मंत्र्यांना सरकार चुकलंय हे सांगायचं असेल तर मंत्रिमंडळ बैठकीत बोलले पाहिजे. बाहेर येऊन बोलायचे असेल तर मंत्रिमंडळातून बाहेर पडले पाहिजे. आता काही लोक आमचे सरकार आल्यास आम्ही असं केलं असतं तसं केलं असतं म्हणतात. मग पूर्वी तुमचं सरकार होतं ना तेव्हा का नाही केलं? राजकारण



करताना कोणत्याही समाजाला वेठीस धरू नका अशा शब्दांत संजय शिरसाट यांनी सुनावलं. मनोज जरांगे पाटलांचा मुख्यमंत्र्यांवर विश्वास आहे. त्यामुळे जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांवर शंका घेऊ नये. तशी शंका घेतली तर मुख्यमंत्री अडचणीत येतात. मुख्यमंत्री यांनी शपथ घेतली आहे ते ती पूर्ण करणार, प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जरांगे यांनी वाट पहावी असं आवाहन संजय शिरसाट यांनी केलं.

---

# जुन्या वादातून युवकाची हत्या !

## सिंदखेड राजा येथील घटना ८ जणांविरोधात गुन्हा, चौघे ताब्यात!




या गंभीर प्रकरणात पोलिसांनी तत्काळ कारवाई करावी, या मागणीसाठी सतीश कांबळे यांचे नातेवाईक व ओळखीच्या व्यक्तींनी मंगळवारी दुपारी पोलिस ठाणे गाठले. संतप्त जमाव शांत करण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. मात्र, घटनेने संतप्त झालेल्या नातेवाइकांनी सर्व आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी केली. शहरातील काही प्रतिष्ठित नागरिकांनी यात हस्तक्षेप करून नातेवाइकांना शांत करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, उर्वरित आरोपींना शोधण्यासाठी पोलिसांनी स्वतंत्र पथक तयार केले आहे.


जनसंचलन/ सिंदखेडराजा

सिंदखेडराजा येथील सामाजिक कार्यकर्ते सतीश कांबळे यांच्यावर जुन्या वादातून त्याच्याच भागात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलासह अख्ख्या परिवाराने हल्ला केला. या घटनेत सतीश कांबळे यांना चाकूचा वर्मी घाव लागल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी महात्मा फुले शाळेजवळ घडली. सोमवारी सायंकाळी जुन्या वादातून सतीश याला सदर शाळेजवळ गाठण्यात आले. एका अल्पवयीन आरोपीसह किशोर कठाळ तोडे, राम कठाळ तोडे, गोपाळ गजानन तोडे, ज्ञानेश्वर राम तोडे, उषा गजानन तोडे, पूजा किशोर तोडे, कठाळ जयराम तोडे (सर्व रा. सिंदखेडराजा) यांनी वाद उकरून काढून सतीश यांच्यावर काठीने वार केले. त्याला जबर मारहाण करण्यात आली. दरम्यान, या तोडे परिवारातील अल्पवयीन आरोपीने सतीश यांच्या मांडीवर चाकूने वार केला. हा वार वर्मी लागल्याने सतीश गंभीर जखमी झाले. रुग्णालयात नेता असतानाच त्यांचा मृत्यू झाला.

---

# जिल्हा परिषद साईओ भाग्यश्री विसपुते यांची संभाजीनगरला बदली

जनसंचलन/बुलढाणा



बुलढाणा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी भाग्यश्री विसपुते यांची छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी बदली करण्यात आले आहे. सिडकोच्या मुख्य प्रशासकीय अधिकारी पदी त्यांचे वर्णी लागले आहे. २६ ऑक्टोबर २०२० रोजी त्यांनी बुलढाणा जिल्हा परिषद सीईओ म्हणून कार्यभार सांभाळला होता. मागील आठ महिन्या आधी त्यांची बदली करण्यात आली होती परंतु प्रकृती अस्वस्थ्यांच्या कारणामुळे त्यांना पुन्हा अवधी वाढवून देण्यात आला होता. श्रीमती विसपुते यांचे दोनाचे चार हात बुलढाण्यातच झाले. याच ठिकाणी लग्न झालेले असल्यामुळे बुलढाण्याच्या आठवणी त्या कधीच विसरू शकणार नाही.

# सैलानी बाबा दर्गा परिसराने घेतला मोकळा श्वास...

## रायपूर ठाणेदार दुर्गेश राजपूत यांची गांधीगिरी...

**जनसंचलन/ चिखली**

सैलानी बाबा दर्गा, पिंपळगाव सराई रायपूर येथे जग प्रसिद्ध असलेले सैलानी बाबा यांची दर्गा असून सदर दर्गा दर्शना साठी नेहमी हजारो भाविक हे नतमस्तक होण्यासाठी येत असतात. बाबा चे दर्शनासाठी विशेष करून सर्व धर्मातील लोक हे मोठ्या भक्ती भावाने येत असतात. या ठिकाणी तुम्हाला खऱ्या अर्थाने जाती धर्म विरहित भाविक व माणसे पाहायला मिळतात.इतर पोलीस स्टेशन पेक्षा रायपूर सैलानी येथे नोकरी करणे म्हणजे एक दिव्यच आहे.कारण रायपूर पो स्टे अंतर्गत व ज्या साठी रायपूर पो स्टे ची निर्मिती झाली ते म्हंजे सैलानी बाबा दर्गा सैलानी बाबा दर्गा येथे दरवर्षी मार्च महिन्यात होळी चे वेळेस जवळपास १५ दिवसांची मोठ्या प्रमाणात यात्रा भरतं असते व त्यात राज्य परराज्यातून भाविक हे लाखो चे संख्येने येत असतात.व दैनंदिन हजारो लोक येथे दर्शनासाठी येत असतात.अशा मुळे येथे नेहमी अस्वच्छता,घाणीचे साम्राज्य पाहायला मिळते तसेच गुन्हेगार याचां फायदा घेऊन आश्रय घेण्यासाठी येत असतात तसेच दर्गा ट्रस्ट व मूळ मुजावर जमीन मालक यांचा सुरू असलेला न्यायालयीन वाद व त्यातून सदर ठिकाणी कोणतेही काम करण्यास प्रशासनास येणाऱ्या अडचणी या सर्व परिस्थितीत पोलिसांना सैलानी येथे काम करायचे असते.त्यामुळे येथे नेमणूक झाल्यावर सैलानी येथे आल्यावर बरेच अधिकारी हे निराश होत असतात. परंतु या मध्ये ठाणेदार म्हणून या ठिकाणी गेल्या सहा महिन्यापासून येथे कामकाज करीत आहे स.पो.नी दुर्गेश राजपूत हे वेगळे ठरत आहेत. ठाणेदार राजपूत यांनी आल्यापासून पो स्टे ची सूत्रे हातात घेतल्या पासून सर्वात जास्त सैलानी बाबा दर्गा येथे लक्ष केंद्रित केले व त्या ठिकाणी काय काय करता येईल या साठी कामकाज सुरू केलें व लोकांना मार्गदर्शन करून स्वच्छतेचे महत्व पटवून दिले येथेच त्यांनी सर्वांची मने जिंकली यानंतर त्यांनी सुरक्षेचे दृष्टीने परिसरातील गुंड,गुन्हेगार,भोंदू बाबा ,मोबाईल चोर, पाकीट मार यांचा चोख बंदोबस्त केला.

सैलानी दर्गा येथे अजून एक मुख्य अडचण होती ती म्हणजे दर्गा कडे जाताना असलेले दुकानदारी अतिक्रमण,व इतर फॉरेस्ट अतिक्रमण ठाणेदार राजपूत यांनी फॉरेस्ट विभाग यांची मदत घेऊन मागील महिन्यात फॉरेस्ट जमिनीवरील अतिक्रमण देखील हटावले परंतु या मध्ये सर्वात महत्वाचे होते दर्गा कडे जात असताना फुल, चादर,लोभान ई.विक्रेते दुकानदार यांचे अतिक्रमण व त्या मधून दर्गा पर्यंत पोहचण्यासाठी तयार झालेला निमुळता व अरुंद रस्ता याबाबत ठाणेदार दुर्गेश राजपूत यांना सदर रस्ता हा निमुळता असल्याने व भाविकांना येण्या जाण्यासाठी होणारी अडचण नेहमी खटकत होती, परंतु सदर बाबत कोणालाही विचारणा केली असता साहेब ते शक्य होणार नाही मुजावर, दुकानदार लोक ऐकणार नाहीत.आज पर्यंत कोणतेही ठाणेदार यांनी हा रस्ता मोकळा केला नाही, प्रॉब्लेम, वाद होतील अशा प्रकारची माहिती त्यांना वारंवार मिळत होती परंतु ठाणेदार दुर्गेश राजपूत यांनी लोकांशी प्रेमाने संवाद साधण्याची कला व तगडा अनुभव याचे जोरावर त्यांनी सैलानी दर्गा बद्दल व येथील लोका बद्दल असलेली मानसिकता बदलून टाकावी या हेतूने त्यांनी सर्व दुकानदार यांचे शी संवाद साधून सर्व दुकाने पाठी मागे नेण्यास व रस्ता मोकळा करण्याबाबत समजावून सांगण्यास सुरुवात केली पहिल्या प्रयत्नात पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नाही परंतु विरोध ही झाला नाही त्यातून राजपूत यांनी प्रेमळ संवाद साधून येता जाता प्रत्येक भेटी मध्ये दुकानदार यांना बोलावून समजवून सांगणे .फायदे तोटे, मदत, भाविक सुरक्षा या बाबी वारंवार सांगून व त्यांची सांगण्याची तळमळ पाहून दुकानदार ,मुजावर लोकांना पाझर फोडण्यात अखेर ठाणेदार यशस्वी झाले व जे मागील एका संपूर्ण शतकात कोणी अधिकारी करू शकले नाही ते काम ठाणेदार दुर्गेश राजपूत यांनी करून दाखवले व ते देखील कोणत्याही कायद्याचा धाक दाखवून नव्हे तर प्रेमाने व मधुर संवाद साधून त्यांनी सर्व दुकानदार मुजावर लोक यांची मने जिंकली व सर्व दुकानदार यांनी स्वतः हुन त्यांची दुकाने



जवळपास १५ - १५ फूट मागे घेतली व रस्ता मोकळा केला व अखेर सैलांनी बाबांनी मोकळा श्वास घेतला असे म्हणण्यास हरकत नाहीं. ठाणेदार राजपूत हे येथेच न थांबता त्यांनी आज रोजी सर्व दुकानदार यांनी प्रशासनास मोठ्या मनाने सहकार्य केले म्हणून ठाणेदार राजपूत यांनी दर्गा परिसर येथे कार्यक्रम घेऊन स्वहस्ते संबंधित दुकानदाराचा सत्कार देखील बाबांचे चरणी करून दिला या गांधीगिरी मुळे दुकानदार सुद्धा भारावून गेले.व दुकानदार यांनी सुद्धा ठाणेदार दुर्गेश राजपूत यांचा अशा विशेष कार्याचा यथोचित सन्मान करून त्यांचा सत्कार केला व यापुढे प्रशासनाला नेहमी सहकार्य करू असे आश्वासन दिले.. ठाणेदार राजपूत यांनी सैलानी मध्ये विविध विषयांवर काम चालू केले असून त्यात संपूर्ण स्वच्छता , कारवा चौक येथे रस्त्यावर वाहने उभे राहू नये या करिता पे अँड पार्क पार्किंग , सुरक्षा म्हणून संपूर्ण पोलीस यंत्रने मार्फत कॅमेरे. लॉज,/ भाडेकरू रेकॉर्ड ठेवणे अशा प्रकारची कामे चालू केलेली आहेत तसेच काही महिन्यांवर येऊन ठेवलेल्या यात्रेचे आतापासूनच त्यांनी नियोजन करने सुरू केले असल्याचे त्यांचे कामावरून दिसून येत आहे सदर विशेष कामाची संकल्पना ही मां.पो.अधीक्षक श्री.सुनील कडासने.आ.पो.आ श्री महामुनी, उपविभागीय पो.आधी. श्री गुलाबराव वाघ यांचे मार्गदर्शन खाली राबविण्यात आली.

## सोन्याच्या गिन्याचे आमिष आठ लाखांनी फसवणूक




**जनसंचलन/ खामगाव**

सोन्याच्या गिन्या देण्याच्या आमिषाने ८ लाख रूपये घेऊन नऊ ते दहा जणांच्या टोळक्याने फसवणूक केल्याचा प्रकार हिवरखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडला. याप्रकरणी रविवारी दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. कल्याण तालुक्यातील कोलीवली येथील हिरालाल पुंडलिक लोखंडे (४०) यांनी हिवरखेड पोलिसांत तक्रार दिली. त्यामध्ये त्यांच्यासह त्यांचा मित्र भगवान रामचंद्र देसाईकर या मित्राला आरोपींनी मोबाइलद्वारे संभाषणातून त्यांच्याकडे सोन्याच्या गिन्न्या असल्याचे आमिष दाखविले. त्यानुसार दोघेही खामगाव तालुक्यातील लोखंडा शिवारात २३ जानेवारी रोजी आले. यावेळी मोबाइलधारक सचिन याच्यासह टोपीवाला अनोळखी व्यक्ती व इतर सात ते आठ जणांनी त्यांना सोन्याच्या गिन्न्या दिल्या. तसेच, आठ लाख रुपये घेतले. त्या सोन्याच्या गिन्न्या बनावट असल्याचे लक्षात येताच आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यावर त्यांनी तातडीने हिवरखेड पोलिसांत धाव घेतली.

## जिल्ह्यातील जातीनिहाय सर्व्हेक्षणाला नागरिकांनी सहकार्य करावे-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील



**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्ह्यात जातनिहाय सर्व्हेक्षण घरोघरी जाऊन करण्यात येत आहे. यात नागरिकांशी निगडीत अन्य माहितीही घेण्यात येत आहे. नागरिकांनी ही माहिती घेण्यासाठी आलेल्या प्रगणकाला योग्य माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. सर्वेक्षणाच्या माध्यमातून जिल्ह्यातील एक हजार ३०६ गावांमध्ये ५ लाख ६४ हजार ५७२ घरांपर्यंत पोहोण्यात येणार आहे. यात २८ लाख ५१ हजार ८०२ लोकसंख्येचे सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. आतापय्रंत ८७ टक्के सर्व्हेक्षण पूर्ण झाले असून ४ लाख ९१ हजार ६७ घरांचे सर्व्हेक्षण पूर्ण झाले आहे. येत्या दोन दिवसात सर्व्हेक्षण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी आज जातनिहाय सर्व्हेक्षणाचा तहसिलदारांकडून आढावा घेतला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, मुख्याधिकारी गणेश पांडे आदी उपस्थित होते. यात प्रामुख्याने प्रगणकांची उपलब्धता, आतापर्यंत झालेल्या नोंदी, खुल्या प्रवर्गातील नोंदी, मराठा समाजाच्या नोंदी, सर्वेक्षणाच्या कामाची टक्केवारी आदींबाबत माहिती घेतली. तहसिलस्तरावरून दररोज सायंकाळी चार वाजता गुगल शीट मध्ये डाटा भरावा. तसेच सर्व्हेक्षणात अद्यापपर्यंत ज्या कुटुंबापर्यंत पोहोचू शकले नाही, त्यांच्यापर्यंत पोहोचून सर्व्हेक्षणाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे. यात नगरपालिका किंवा जास्त घनता असलेल्या क्षेत्रात सर्व्हेक्षण करताना मेहनत घ्यावी लागणार आहे. कमी कालावधीत जास्त कुटुंबापर्यंत पोहेचून सर्वेक्षणाचे काम पूर्ण करावे लागणार आहे. त्यामुळे सार्वजनिक सुविधा आहेत, त्यांची माहिती प्रगणकाने स्वतः भरावी. नागरी भागात कार्यालये, शाळा, दुकाने अशा ज्या ठिकाणी नागरिक उपलब्ध होतील, त्याठिकाणी सर्व्हेक्षण करण्यात यावे. तसेच मजूर, स्थलांतरीत नागरिकांचे योग्य सर्व्हेक्षण करावे. जिल्ह्यात खुल्या प्रवर्गातील नागरिकांची संख्या कमी दिसून येत आहे. त्यामुळे या नोंदी घेण्याकडे प्रगणकांनी अधिक लक्ष पुरविणे आवश्यक आहे. तसेच जिल्ह्याचे सर्व्हेक्षण दोन दिवसात पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवले असल्याने यात सर्व यंत्रणांनी जाणिवपूर्वक काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# बूथ कमिटीचे सदस्य करणार संदीप शेळकेंचा मार्ग सुकर !

## वन बुलढाणा मिशनचा ३ फेब्रुवारीला बुलडाण्यात बूथ कमिटी मेळावा

जनसंचलन/बुलढाणा

निवडणुकपूर्व तयारीत राजर्षी शाहू परिवाराचे अध्यक्ष तथा वन बुलडाणा मिशन या राजकीय लोकचळवळीचे संकल्पक संदीप शेळके यांनी चांगलीच भरारी घेतली आहे. आतापर्यंत सहाही विधानसभा मतदारसंघातील विविध गावांत त्यांनी जाहीरनामा जनतेचा या अभियाना अंतर्गत संवाद मेळावे घेतले आहेत. आता येत्या ३ फेब्रुवारीला महत्वपूर्ण कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. बुलडाण्यात बूथ कमिटि सदस्यांचा मेळावा होणार आहे. लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक गावाचे प्रतिनिधी या मेळाव्यात सहभागी असून हा मेळावा संदीप शेळके यांच्या विजयाचा मार्ग सुकर करण्यासाठी मदतीचा ठरणार आहे. ३ फेब्रुवारी रोजी बुलडाणा शहरातील चिखली रोडवरील साईकृपा लॉन्स येथे हा मेळावा होणार आहे. या आधी वन बुलडाणा मिशनचे घेतलेला बूथ बांधणी मेळावा सुद्धा चांगलाच राजकीय चर्चेचा विषय ठरला होता. दरम्यान वन बुलडाणा मिशनने आतापर्यंत १२०० पेक्षा अधिक बूथ ची बांधणी पूर्ण केली आहे, उर्वरित बूथ बांधणी देखील पुढच्या काही दिवसांत पूर्ण होणार आहे. ३ फेब्रुवारीला होणाऱ्या मेळाव्यात प्रत्येक बूथ प्रमुख व कमिटी सदस्य सहभागी होणार आहेत. १२ हजार विजयदुत या मेळाव्यात सहभागी होणार आहेत. गाव तिथे बूथ कमिटी असे पक्के नियोजन




वन बुलडाणा मिशनच्यावतीने करण्यात आले आहे. एकीकडे इतर इच्छुक उमेदवार उमेदवारी मिळेल की नाही या संभ्रमात असताना संदीप शेळके यांची तयारी मात्र अतिशय जोरात, पण तेवढेच सूक्ष्म नियोजन करून सुरू आहे. अर्थातच या तयारीचा फायदा संदीप शेळके यांना लोकसभा निवडणुकीत होणार आहे.

# रोहयोच्या लेखापरीक्षणासाठी अर्ज आमंत्रित

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हाधिकारी कार्यालयातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या संवैधानिक लेखा परिक्षणासाठी इच्छुकांकडून निविदा मागविण्यात आल्या आहेत. यासाठी दि. १ ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान अर्ज करावे लागणार आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत जिल्ह्याचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे अकाऊंड मॅनेजमेंट निगडीत सेवा आणि संवैधानिक लेखापरिक्षण करण्याकरीता इच्छुक निविदा धारकांकडून निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा दि. १ ते १५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत सायंकाळी ५ वाजेपर्यंत सिलबंद लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर निविदा ही महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत, मनरेगाची कामे करणाऱ्या सर्व यंत्रणा, पंचायत समिती कार्यालय, तहसिल कार्यालय, जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालय (रोहयो शाखा) यांचे लेखा परिक्षण करणे यासाठी मागविण्यात आली आहे. या निविदा दि. २२ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय उघडण्यात येणार आहे. याबाबत अधिक माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे.



# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत दहिद बुद्रुक येथे महावाचन

जनसंचलन/बुलडाणा

दहिद बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानअंतर्गत दररोज अर्धा तास महावाचन राबवण्यात येत आहे. शाळेचे मुख्याध्यापक आत्माराम गायकवाड तथा सर्व शिक्षक वृंद आणि सर्व विद्यार्थी ग्रंथालयातील विविध पुस्तकांचे वाचन करतात. शालेय प्रांगणात बैठक रचना करून विद्यार्थ्यांचे स्वयं शिस्तीत वाचन घेतले जाते. विद्यार्थी मन लावून पुस्तके वाचतात. स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना विशद करण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांना वाचनाच्या सवयीची गरज शिक्षक वृंदांतर्फे



समजावून सांगण्यात आली आहे. शाळेमध्ये वाचन प्रेरणा दिन, शंभर दिवस वाचन अभियानही राबवण्यात आले. मुख्याध्यापक स्वतः आणि गणेश मुळे, जितेंद्र पालकर, सुनंदा गायकवाड, आशा खेत्रे, कावेरी जाधव, पल्लवी खरात, राजेंद्र गवई, जयश्री जाधव हे सर्व शिक्षक वृंद विद्यार्थ्यांवर वाचनाचे संस्कार करत आहेत.

# अवैध धंदे बंद करण्यासाठी चक्क पत्रकारांना बसावे लागले उपोषणाला...

## उपोषणचा ६ वा दिवस निघाला मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा,रायपूर, सैलानी,चिखली पोलीस स्टेशन हद्दीतील व या परिसरातील अवैध धंदे वरली मटका जुगार अड्डे बंद करण्यात यावे. या मागणीसाठी बुलढाण्यातील पत्रकार पुरुषोत्तम बोर्डे व इस्रार देशमुख यांनी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. आज आंदोलनाचा ६ वा दिवस असून अद्याप पर्यंत प्रशासनाने दखल घेतलेली नाही. तर आंदोलनाची दखल न घेतल्यास विभागीय कार्यालयासमोर आणि मंत्रालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा यावेळी आंदोलन करते पत्रकार पुरुषोत्तम बोर्डे इस्रार देशमुख यांनी दिला आहे. तसेच हा उपोषणाला राजकारणी पार्टी यांनी सुद्धा बेमुदत आंदोलन ला पाठिंबा दिला आहे. खासदार प्रतापराव जाधव,मा.आ.भाजप बुलडाणा लोकसभा प्रमुख विजयराज शिंदे, राष्ट्रवादी कॉंगेस पार्टी महिला जिल्हाध्यक्ष प्रा अनुजा साळवे, महीला शहर अध्यक्ष नाजमा शेख यांनी सर्वांनी भेट देऊन पाठिंबा दिला आहे. अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष इंजि. अशोक भोसले, जिल्हा कार्याध्यक्ष इंजि. शिवाजी जोहरे, डॉ बबनराव परमेशोर, अनिल



बोरकर, राजुभाऊ इरछे, समाधान चिंचोले, विलास खंडेराव यांनी सुध्दा भेट देऊन जाहिर पाठिंबा दिला. मागण्या लवकर मान्य न झाल्यास तिव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येणार आहे असा इशारा आंदोलन कर्ते पत्रकार पुरुषोत्तम बोर्डे इस्रार देशमुख यांनी दिला

# लोकसभा निवडणुकीसाठी यंत्रणांनी पूर्वतयारी करावी-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाने तयारी सुरू केली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील निवडणुकीशी संबंधीत यंत्रणांनी पूर्वतयारी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले. निवडणुकीच्या अनुषंगाने आज आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी बुलडाणा उपविभागीय अधिकारी पुलकीत सिंह, जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासने, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोनेवार आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले, येत्या काही दिवसात निवडणुकीच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे. आचारसंहिता लागू झाल्याबरोबर विविध समित्या आणि कार्यवाही करणाऱ्या यंत्रणांना देण्यात आलेल्या कामांची पूर्वतयारी करून ठेवावी. प्रामुख्याने शासकीय संकेतस्थळ, सार्वजनिक ठिकाणी असलेल्या जाहिराती हटविण्यात याव्यात. आचारसंहिता लागू झाल्याबरोबर खर्च विषयक निरीक्षक जिल्ह्यात येतात. त्यांच्या दृष्टीने आवश्यक असलेली माहिती पुरविण्यात यावी. निवडणूक व्यवस्थितरित्या पार पाडण्यासाठी कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात यावी. याकामी आवश्यक असणारा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात यावा. बाहेरून येणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांची व्यवस्था करण्यात यावी. मतदान आणि मतमोजणीच्या ठिकाणी सुरक्षा ठेवण्यात यावी. तसेच संवेदनशील मतदान केंद्राच्या ठिकाणी अतिरिक्त सुरक्षा देण्यात यावी. निवडणूक कामासाठी आवश्यक असणाऱ्या वाहनांची व्यवस्था करण्यात यावी. मतदान केंद्राच्या ठिकाणी स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, मतदान यंत्राच्या ठिकाणी पुरेसा प्रकाश, दिव्यांग व्यक्तींसाठी रॅम्प आदी व्यवस्था प्राधान्याने पूर्ण कराव्यात. दरम्यान जिल्हाधिकारी यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील मतमोजणी केंद्राची पाहणी केली. याठिकाणी उमेदवारांची प्रतिनिधी, कर्मचारी, मतमोजणी करणारे कर्मचारी, अधिकारी यांच्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयीसुविधा उपलब्ध करण्यात



याव्यात, तसेच याठिकाणी मतदानानंतर ईव्हीएम मशिन ठेवण्यात येणार आहे, तेथे पुरेशा विजेची व्यवस्था, सुरक्षा ठेवण्यात यावी. निवडणुकीची सर्व प्रक्रिया व्यवस्थित पूर्ण होण्यासाठी यंत्रणांना कामे नेमून देण्यात आली आहे. तसेच निवडणूक आयोगाकडून येणाऱ्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी यावेळी दिल्या.

# मातृतीर्थावर ऐतिहासिक तिसरी विधवा परिषद...

## महात्मा फुलेंचे वारसदार प्रा.लहाने ठरलेत-मा.मंत्री आ.डॉ.राजेंद्र शिंगणे

जनसंचलन/बुलढाणा

महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले यांनी केलेले कार्य पुढे नेण्याचे काम जर कोणी करत असेल तर ते प्रा. डी एस लहाने हे करीत आहे. विधवा परिषदेच्या माध्यमातून त्यांनी चालविलेले विधवांच्या उद्धाराचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. इतिहास याची नोंद घेईल. असे प्रतिपादन माजी मंत्री डॉक्टर राजेंद्र शिंगणे यांनी केले. तिसऱ्या विधवा परिषदेचे उद्घाटन मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे आज डॉ. शिंगणे यांच्या हस्ते पार पडले.यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष ऍड नाझेंर काझी होते. तर विधवा परिषदेचे संकल्पक प्रा. डी एस लहाने, राष्ट्रवादीचे नेते डॉ. रामप्रसाद शेळके, शिवाजी राजे जाधव, माजी आमदार वसंतराव शिंदे, माजी जिल्हा परिषद सभापती गंगाधर जाधव, पुनम राठोड ,सवडे ताई ,कल्याणी शिंगणे ,राजेश चित्ते, राम राठोड , राजू शिरसाठ, प्रा. शाहिनाताई पठाण ,स्वाती सावजी, अश्विनी सोनवणे ,प्रतिभा भुतेकर आदींची उपस्थिती लाभली. दुपारी डॉक्टर राजेंद्र शिंगणे यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन पार पडले. या विधवा परिषदेसाठी सिंदखेडराजा, देऊळगाव राजा तालुक्यात सह जिल्ह्याच्या विविध भागातून विधवा भगिनी, लग्नाळू मुले, विधुर मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. पुढे बोलताना डॉक्टर राजेंद्र शिंगणे म्हणाले ,सिंदखेड राजा ही भूमी नवा विचार देणारी भूमी आहे. महात्मा ज्योतिबा फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी नवविचारांची पेरणी केली. तद्वतच राष्ट्रमाता जिजाऊ यांनी सुद्धा विधवा प्रथा त्याकाळी नाकारली. शहाजीराजे यांच्या निधनानंतर जिजाऊ सती गेल्या नाही. या प्रथेला नाकारून त्यांनी जगापुढे आदर्श उभा करणारा राजा छत्रपती शिवराय घडविला. हा आदर्श आपण घेतला पाहिजे. आपण विधवा आहोत,आपन अबला आहोत असं न समजता आहे त्या परिस्थितीमध्ये संघर्ष करण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे असे शिंगणे म्हणाले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर रामप्रसाद शेळके, शिवाजीराजे जाधव, यांनी विचार व्यक्त केले.ठराव वाचन शाहिना पठाण यांनी केले. राम राठोड यांनी नियोजन केले.संचलन प्रा.सतीश धोटे तर आभार प्रा. मधुकर गव्हाड यांनी मांनले.

काही गोष्टी काळानुरूप स्वीकाराव्या लागतात. जे लोक बदल स्वीकारतात अशा लोकांना परिस्थितीशी जुळवून घेता येते. सध्याचा काळ हा विचित्र आहे. गावागावांमध्ये मुलांची लग्न होत नाही. ३५, ४० वर्षे वय झाल्यानंतरही मुलांना मुली मिळत नाही. तर दुसऱ्या बाजूला कमी वयामध्ये विधवा झालेल्या महिलांची संख्या मोठी आहे. अशा वेळी आपण मानसिक बदल स्वीकारून नव विचारांची पेरणी करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन कार्यक्रमाचे संकल्पक प्रा. डी एस लहाने यांनी केले. महिलांना विश्वास दिला, त्यांच्या मुलांना सांभाळण्याची तयारी दाखवली तर अनेक विधवा महिला लग्नासाठी तयार होतील असे ते म्हणाले. सिंदखेड राजा येथे झालेली महिला परिषद यशस्वी ठरली. सकाळपासूनच हजारो विधवा महिला व त्यांच्या कुटुंबीयांनी कार्यक्रम



स्थळी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.आतापर्यंत विधवा परिषदेच्या माध्यमातून १२ विधवांचे विवाह लावण्यात आले आहे. तर तीन विवाह आगामी पंधरवड्यात लावले जात आहे.ही चळवळ बुलढाणा जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रव्यापी होत आहे.याची सुरुवात प्रा. डी एस लहाने यांच्या संकल्पनेत बुलढाणा येथे प्रथम घेण्यात आली होती. महात्मा ज्योतिराव फुले यांच्यानंतर शंभर वर्षांनी एक ऐतिहासिक पाऊल बुलढाणा नगरीतून प्रा. लहाने यांनी टाकले आहे.

### लहाने ले आऊट ग्राउंड मध्ये कथा मंडपाचे भूमिपूजन संपन्न...

## सभागृहाचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी दिव्यसुंदरकांड व भागवत कथा श्रवण करावी - राधेश्यामजी चांडक

जनसंचलन/बुलढाणा

सद्भावना सेवा समिती द्वारा दि.६ फेब्रुवारीला प.पू.संत सुश्री अलकाश्रीजी यांची भव्य शोभायात्रा व दिव्य सुंदरकांड आणि दि.७ फेब्रुवारी पासून सुश्री देवी प्रियंकाजी यांची श्रीमद् भागवत कथा आयोजित केली असुन या सर्व आध्यात्मिक सत्संगाचा लाभ घ्यावा,व कथा श्रवण करुन परमानंद प्राप्त करावा असे आवाहन समितीचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी यांनी कथा मंडपाच्या भूमिपूजन प्रसंगी केले.

लहाने ले आऊट, बुलडाणा येथे कथा मंडप भूमिपूजन प्रसंगी विधानपरिषदेचे आमदार धिरज लिंगाडे यांनी विधीवत पंडित गणेश पाठक यांच्या कडून पूजा करुन घेतली.मान्यवरांनी कुदळ मारुन गणेशा केला.इतर सर्वांनी हातभार लावला सुंदरकांड व भागवत कथेला सर्वांनी सहकार्य करुन लाभ घ्यावा असे आवाहन आ.लिंगाडे यांनी करुन कथेला शुभेच्छा दिल्या.आ.संजय गायकवाड यांनी



कथेला तन, मन, धनाने सहकार्य करावे असे आवाहन चा संदेश पाठवून केले. रामलला प्राण प्रतिष्ठा आणि सद्भावना सेवा समितीचे रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.या भूमिपूजन प्रसंगी चंपालाल शर्मा, राजेश देशलहरा, सिध्दार्थ शर्मा,प्रकाशचंद पाठक, सुरेश गट्टाणी, सुभाष दर्डा, विजय सावजी, विजय शर्मा, पंजाबराव ईलग,प्रकाश वाठकर,सौ.पूर्णिमा महाजन, डॉ पवन बजाज, गिरधरी शर्मा,नरेश मुंदडा, गोपाल चिराणिया,लाला माधवाणी, मनमोहन शर्मा, बाळासाहेब गिव्हे, चंद्रशेखर माळी, मदनलाल शर्मा, राजेश नारखेडे, विजय जोशी,राजु टेकाडे, शेवाळे मामा, गजानन वैद्य, अनंताभाऊ देशपांडे, चंद्रशेखर सदावर्ते, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी राधेश्याम चांडक, आणि आ.धिरज लिंगाडे यांनी प्रकट मुलाखती देवून कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन केले.भूमिपूजनाचे पौरोहित्य पंडित गणेश पाठक आणि गणेश जोशी यांनी केले.

## गटविकास अधिकारी यांच्या कक्षात ठिय्या आंदोलन

जनसंचलन/बुलडाणा

बुलढाणा तालुक्यातील देऊळघाट ग्रामपंचायत मध्ये लाखोंचा भ्रष्टाचार केल्याची तक्रार उपसरपंच आरिफ खान यांच्यासह इतरांनी बुलढाणा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली होती. या तक्रारीची दखल घेत चौकशी समिती स्थापन करून चौकशी करण्यात आली असता त्यात आरोपात तथ्य आढळल्याने देऊळघाट ग्रामविकास अधिकाऱ्याला एका आदेशान्वय निलंबित केल्याचे समजते परंतु सदर निलंबन आदेशाची



परत तक्रारकर्त्यांना देण्यात आली नाही. त्यामुळे उपसरपंच आरिफ खान यांच्यासह इतरांनी आज ३१ जानेवारीला सायंकाळी ५ वाजता बुलढाणा पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्या कक्षातच ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. निलंबन आदेशाची परत देण्यात यावी अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

